## निशाण क्रमांक ०४ खालील आदेश.

अर्जदार यांनी सदरचा अर्ज सामनेवाला यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे व मुळ अर्जातील कथने सदर अर्जाचे कामी वाचणेस विनंती केली आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार हिने कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २०, २२ नुसार सामनेवाला यांचे विरूध्द अर्ज दाखल केला असुन सदर अर्जावर निकाल लागण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे अर्जदार त्यांचे जीवन जगण्याकरीता औषधपाण्याची, अन्नधान्याची कपड्यालत्याची व आर्थिक गरजा पूर्ण करण्यास समर्थ नसुन त्यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदाराचे संगोपन, संवर्धन करणे ही सामनेवाला याची नैतिक जबाबदारी आहे. परंतू सामनेवाला यांनी अर्जदारा यांना जाणीवपुर्वक मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास बोलुन चालून घरात अपमानित करून अत्याचार केलेला आहे. याउलट, सामेनवाला क्र. १ हा खाजगी कंपनीमध्ये नाकरीला आहे. तसेच सामनेवाला क्र.२ यांच्या भाजीपाल्याचा मोठा व्यवसाय आहे आणि सामेनवाला क्र.३ ही देखील नोकरीवर आहे. त्यामुळे सामनेवाला यांना नोकरीपासुन व भाजीाल्याच्या व्यवसायापासुन जवळपास १५ ते १६ लाख रूपये वार्षिक उत्पन्न मिळते. सामनेवाला यांच्या कुटूंबामध्ये घरभाडयापासुन देखील उत्पन्न मिळत असुन त्यांचे जालना शहरामध्ये प्लॉट असल्यामुळे सामेनवाला हे अर्जदाराच्या मागण्या सहज पुर्ण करू शकतात. अर्जदार यांचे संगोपन, संवर्धन करणे ही सामेनवाला क्र. १ यांची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदार हिला जीवन जगण्याकरीता दरमहा रुपये ३०,०००/- महागाईच्या काळात लागत असुन सामनेवाला सदर रक्कम देण्यास समर्थ असल्यामुळे तिला उदरनिर्वाहासाठी, एकुण रक्कम रु.३०,०००/- अंतरिम पोटगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याबाबत सदर अर्ज दाखल केलेला आहे.

०४. सदर अर्जावर नोटीस बजावूनही सामनेवाला यांनी आपला म्हणणे (Say) दाखल केलेले नाही. त्यामुळे सदर अर्ज हा त्यांच्या म्हणण्याशिवायच पुढे चालविण्यात आला. अर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता व दायत्वाबाबतचे प्रतिज्ञापत्र (Assets and Liability Affidavit) दाखल केले

असून ते निशाणी ०९ वर आहे.

०५. अर्जदार यांच्या कथनानुसार, त्यांच्यावर घरगुती हिंसाचार झाल्याचे, त्यामुळे सध्या त्या माहेरी राहत असून त्यांच्याकडे कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार यांच्या दैनंदिन गरजा, औषधोपचार, अन्नधान्य व जीवनावश्यक खर्च भागविण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्याची आवश्यकता आहे. सदर कथनास विरोधार्थ सामनेवाला यांनी कोणतेही म्हणणे दाखल केलेले नसल्यामुळे अर्जदार यांचे कथन हे प्रथमदर्शनी अबाधित राहिलेले आहे. अर्जदार यांनी मुळ अर्जात सामनेवाला यांनी चार चाकी गाडी घेण्याकरीता तुझ्या आईवडीलांकडून पाच लाख रूपये घेवून ये अशी बेकायदा पैशांची मागणी करुन मागणी पुर्ण न केल्यामुळे अर्जदाराचा मानसिक व शारीरिक छळ करुन अर्जदारवर घरगुती हिंसाचार केल्याचे कथन केले आहे. सकृतदर्शनी सदरची कथने ही घरगुती हिंसाचार या सदरात मोडतात.

०६. उपलब्ध कागदपत्रे, अर्जदार यांनी दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व प्रकरणातील परिस्थिती विचारात घेतली असता, अर्जदार सध्या माहेरी वास्तव्यास असून त्यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. जीवनमानाचा दर्जा, सध्याचा महागाईचा काळ व अर्जदार यांच्या दैनंदिन गरजा विचारात घेता अर्जदार यांना काही प्रमाणात अंतरिम पोटगी मंजूर करणे न्याय्य व योग्य ठरते असे न्यायालयास वाटते. म्हणून प्रकरणातील परिस्थिती व न्यायालयीन विवेकाधिकार वापरून अर्जदार यांना दरमहा रुपये ३०००/- (रुपये तीन हजार फक्त) इतकी अंतरिम पोटगी देणे उचित ठरेल, असे न्यायालयास वाटते.

## आदेश

१. अर्जदार यांचा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम २३ अन्वये दाखल केलेला अंतरिम पोटगीचा अर्ज **अंशतः मंजूर** करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार यांना **दरमहा रुपये ३०००/- (रुपये तीन हजार फक्त)** इतकी अंतरिम पोटगी अदा करावी.

३. सदर रक्कम अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून देय राहील व दरमहा नियमित अदा करावी.

४. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, मालेगांव यांना पाठविण्यात यावी.

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.03.09 16:32:09 +0530

स्थळ - मालेगांव. **( अ. सु. कोष्टी )**

दिनांक. ०७.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मालेगांव.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Order **:-** | | |
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B. Patange (L.G.)** |
| 2. Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon |
| 3. Order dated | :- | 07.03.2026. |
| 3. Order Signed by the P.O. | :- | 09.03.2026. |
| 4. Order uploaded on | :- | 09.03.2026. |

**<u>निशाण क्रमांक ०१ खालील आदेश</u>.**

सामनेवाला यांनी निशाण ८ वरील आदेशानुसार पुर्तता केली नसल्याने प्रकरण पुन्हा विना म्हणणे चालविण्यात येते.

स्थळ – मालेगांव. ( **अ. सु. कोष्टी** )
दिनांक. १३.०२.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मालेगांव.